# प्रकरण चौथे

# संशोधन कार्यपध्दती.

४.०१ प्रास्ताविक.

४.०२ पूर्वतयारी.

४.०३ संशोधन पध्दती.

४.०४ नमुना निवड.

४.०५ संशोधनाची साधने.

४.०६ मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली.

४.०७ शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली.

४.०८ गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची.

४.०९ उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची.

४.१० शिक्षणाधिकाऱ्यासाठी प्रश्नावली.

४.११ माध्यमिक शाळांना भेटी व निरीक्षणे.

४.१२ संशोधनाची कार्यपध्दती.

४.१३ समारोप.

# प्रकरण चौथे
# संशोधन कार्यपध्दती.

## ४. ०१ प्रास्ताविक.

संशोधकाने माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा अभ्यास या विषयावर संशोधन करण्याचे निश्चित केल्यानंतर संशोधन कार्यासाठी लातूर जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडले. लातूर जिल्ह्याला सुरूवातीपासूनच ऐतिहासिक, राजकीय व शैक्षणिक पार्श्वभूमी लाभली आहे. जिल्ह्याचा शिक्षणाबाबतचा पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्र राज्यात 'लातूर पॅटर्न' म्हणून प्रसिध्द आहे. तर जिल्हा निर्मितीपासूनच येथील लोकप्रतिनिधींचे केंद्रात आणि राज्यात महत्त्वाचे स्थान राहिलेले आहे. भौगोलिक बाबतीत जिल्ह्यातून मांजरा आणि तेरणा या दोन प्रमुख नद्या वाहत असल्याने येथील जमीन सुपीक बनली आहे. बाजरी, भूईमुग, ऊस ही जिल्ह्यातील शेतकऱ्यांची प्रमुख पिके आहेत. येथील बाजारपेठ देखील मराठवाड्यातील प्रमुख बाजारपेठांपैकी एक आहे. जिल्हानिर्मितीनंतर जिल्ह्यात स्थापन झालेल्या साखर कारखाण्यांमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती झालेली आहे.

जिल्ह्याची शैक्षणिक प्रगतीदेखील झपाट्याने झालेली आहे. जिल्ह्याने शिक्षणाचा प्रचार आणि प्रसाराच्या बाबतीत संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती साधलेली आहे. जिल्ह्यात माध्यमिक शाळांची संख्या ५२४ इतकी आहे. त्यापैकी फक्त ५० शाळां जिल्हा परिषदे मार्फत चालविल्या जातात तर उर्वरित शाळा या खाजगी शिक्षणसंस्थेंमार्फत चालविल्या जातात. जिल्ह्यात अध्यापक विद्यालये, अध्यापक महाविद्यालये, कृषी विद्यालये, शासकीय कृषी महाविद्यालय, शासकीय व खाजगी आय.टी.आय. आयुर्वेद महाविद्यालय, होमीओपॅथिक मेडीकल कॉलेज, शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालये, वरिष्ठ महाविद्यालये, महिला वरिष्ठ महाविद्यालय इ. प्रकारच्या शिक्षण विषयक सुविधा उपलब्ध आहेत. त्याचबरोबर विभागीय मंडळ व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालये देखील जिल्ह्यात जिल्ह्याच्या ठिकाणी आहेत.

लातूर जिल्ह्यात आज लातूरसह औसा, उदगीर, निलंगा, अहमदपूर, चाकूर, रेणापूर, देवणी, जळकोट व शिरूर अनंतपाळ अशा एकूण दहा तालुक्यांचा समावेश आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी (२०,८०,२८५)

७१.५ टक्के लोक साक्षर असून महाराष्ट्राचे हेच प्रमाण ७६.९ टक्के इतके आहे. साक्षरतेचे प्रमाण तुलनात्मकदृष्ट्या ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात अधिक आहे. ग्रामीण भागात एकूण ६८.९ टक्के व नागरी भागात ८०.१ टक्के लोक साक्षर आहेत. ग्रामीण भागात साक्षरतेचे सर्वाधिक प्रमाण शिरूर अनंतपाळ तालुक्याचे तर सर्वात कमी प्रमाण औसा तालुक्याचे आहे. शहरी भागात सर्वाधिक टक्केवारी अहमदपूर शहराची आहे तर सर्वात कमी टक्केवारी निलंगा शहराची आहे.

जिल्ह्यात शैक्षणिक वर्षे २००३-२००४ मध्ये १,४८५ प्राथमिक शाळा, ३६७ माध्यमिक शाळा, १२१ उच्च माध्यमिक शाळा व ३३ वरिष्ठ महाविद्यालये आहेत. या शैक्षणिक वर्षात उपरोक्त सर्व संस्थामध्ये ६,६३,१३२ विद्यार्थी होते. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालीय स्तरावर शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांची संख्या व टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे.

**कोष्टक क्र. ४.०१**

**जिल्ह्यातील विविध स्तरावरील विद्यार्थी संख्या.**

| अ.क्र | शैक्षणिक स्तर | विद्यार्थी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पूर्व प्राथमिक /प्राथमिक | ३,९८,७७१ | ६०.१३ |
| २. | माध्यमिक | १,४१,२८५ | २१.३१ |
| ३. | उच्च माध्यमिक | ९७,१८७ | १४.६६ |
| ४. | महाविद्यालयीन | २५,८८९ | ३.९० |
| | एकूण | ६,६३,१३२ | १००.०० |

संशोधक हा लातूर जिल्ह्यातील रहिवाशी असल्याने व लातूर येथेच कनिष्ठ महाविद्यालयात नोकरीत असल्याने संशोधनकार्यासाठी लातूर जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडलेले आहे.

जिल्ह्यात असणाऱ्या माध्यमिक शाळांपैकी बहुतांश शाळा या खाजगी संस्थेमार्फत चालविल्या जातात. अनेक माध्यमिक शाळा पाचवी ते दहावी अशा प्रकारच्या आहेत तर कांही माध्यमिक शाळा आठवी ते दहावी पर्यंत आहेत. त्यापैकी कांही शाळांना आकरावी व बारावी चे वर्ग जोडलेले आहेत.

जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या माध्यमिक विद्यालयांपैकी जिल्हा परिषदेमार्फत

चालविल्या जाणाऱ्या ५० माध्यमिक विद्यालयांना व इंग्रजी माध्यमाच्या शाळांना वगळून उर्वरित सर्व माध्यमिक विद्यालयांची संशोधकाने संशोधन कार्यासाठी निवड केलेली आहे.

निवड केलेल्या माध्यमिक विद्यालयात पूर्णतः अनुदानीत, अंशतः अनुदानीत, विना अनुदानीत व कायम विना-अनुदानीत अशा सर्व प्रकारच्या शाळांचा समावेश आहे.

**४.०२ पूर्वतयारी.**

लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकीय समस्यांचा अभ्यास हा विषय संशोधकाने संशोधनासाठी निवडल्यानंतर लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा अभ्यास करण्याचे संशोधकाने ठरविले. जिल्ह्यातील एकूण दहा तालुक्यातील पूर्णतः अनुदानीत, अंशतः अनुदानीत, विना-अनुदानीत व कायम विना अनुदानीत मराठी व उर्दू माध्यनाच्या शाळांचे प्रशासन कसे चालते याचा अभ्यास करण्याचे संशोधकाने निश्चित केले. प्रस्तुत विषयाच्या अभ्यासात इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा अभ्यास करण्यात आलेला नाही. लातूर जिल्ह्यात सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून एकूण ५२४ माध्यमिक शाळा आहेत त्यापैकी ५० माध्यमिक शाळा ह्या जिल्हा परिषदे मार्फत चालविल्या जातात. त्यांचाही अभ्यास प्रस्तुत विषयात करण्यात आलेला नाही. उर्वरीत ४७४ माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

लातूर जिल्ह्यातील एकूण ४७४ माध्यमिक शाळांपैकी २५ माध्यमिक शाळांना संशोधकाने प्रत्यक्ष भेटी दिल्या. संशोधकाने भेटी दिलेल्या शाळांत शालेय परिसर शैक्षणिक वातावरण, इमारत व इतर भौतिक सुविधांची पाहणी केली. शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापकांशी चर्चा केली. मुख्याध्यापक हा शाळेतील प्रमुख प्रशासक असल्याने संशोधन कार्यासाठी मुख्याध्यापकांची निवड केली, कारण माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाची कार्यवाही मुख्याध्यापकाकडून केली जाते हे शाळा भेटीतून संशोधकाच्या निदर्शणास आले.

शाळा तपासणीचे काम प्रत्यक्षपणे विस्ताराधिकारी करतात म्हणून जिल्हा परिषदेत काम करण्याऱ्या सर्व विस्ताराधिकाऱ्यांची निवड संशोधन कार्यासाठी संशोधकाने केली. त्यांचेकडून प्रत्यक्ष चर्चा करून व प्रश्नावलीद्वारे संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविली.

विस्ताराधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य उपशिक्षणाधिकारी करतात. उपशिक्षणधिकारी हा शैक्षणिक प्रशासनातील महत्त्वाचा घटक असल्याने त्यांची संशोधन कार्यासाठी निवड करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात एकूण दोन उपशिक्षणाधिकरी कार्यरत आहेत. त्यांचेकडून संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संशोधकाने मुलाखतीद्वारे मिळविली.

गटशिक्षणाधिकारी हा तालुका पातळीवरील प्रमुख शैक्षणिक प्रशासक आहे. त्यांच्याकडे प्रामुख्याने प्राथमिक शाळांचे प्रशासन व नियंत्रण या बाबी येतात, परंतु माध्यमिक शाळांच्या बाबतीत त्यांना आपल्या तालुक्यातील कांही शाळांची पाहणी व तपासणी करून माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांस अहवाल सादर करावा लागतो. तसेच विभागीय परिक्षा मंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षाचे कार्य करावे लागते. म्हणून संशोधकाने जिल्ह्यातील एकूण दहा तालुक्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांची संशोधन कार्यासाठी निवड केली. त्यांच्याशी चर्चा करून व मुलाखतीद्वारे संशोधनास आवश्यक असणारी माहिती मिळविली.

शिक्षणाधिकारी (मा.) हा जिल्ह्याच्या संपूर्ण माध्यमिक शिक्षण विभागाचा प्रमुख प्रशासक असल्याने संशोधकाने त्यांची संशोधन कार्यासाठी निवड केली. त्यांच्याकडून प्रश्नावलीद्वारे व प्रत्यक्ष चर्चेतून संशोधनास आवश्यक असणारी माहिती मिळविली.

**४.०३ संशोधन पध्दती.**

संशोधनासाठी निवडलेला विषय हा भूतकाळाशी, वर्तमानकाळाशी अथवा भविष्यकाळाशी संबंधित असू शकतो. विषय कोणताही असो संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संशोधनाच्या पुढील कोणत्याही एका संशोधन पध्दतीचा उपयोग केला जातो.

१) ऐतिहासिक संशोधन पध्दती.

२) प्रायोगिक संशोधन पध्दती.

३) वर्णनात्मक संशोधन पध्दती.

संशोधन कार्यासाठी निवडलेली समस्या वर्तमानकाळाशी सबंधित असेल तर वर्तनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला जातो. वर्णनात्मक संशोधन पध्दतीत खालील साधनांचा वापर केला जातो.

१) सर्वेक्षण पध्दती.

२) व्यक्ती अभ्यास.

३) तौलनिक कार्यकारण पध्दती.

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. जिल्ह्यातील सर्व खाजगी माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, माध्यमिक शिक्षण विभागाचे विस्ताराधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांना प्रस्तुत संशोधन कार्यात प्रशासक संबोधण्यात आले आहे.

संशोधन कार्यात प्रामुख्याने खालील बाबींचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

१) जिल्ह्यातील खाजगी माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांचे प्रशासन.

२) जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील प्रशासन.

३) जिल्ह्यातील खाजगी माध्यमिक शाळांच्या प्रशासनाच्या समस्याचा अभ्यास.

४) जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासनाच्या समस्यांचा अभ्यास.

५) माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनात येणाऱ्या विविध समस्यांवर उपाय सूचविणे.

६) तालुका पातळीवरील शैक्षणिक प्रशासन.

वरील सर्व बाबी या वर्तमानाशी निगडीत असल्याने संशोधकाने प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंबं केला आहे. प्रस्तुत संशोधनात प्रशासकीय समस्याचां अभ्यास अपेक्षित असल्याने शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी व मुख्याध्यापक या प्रशासकांची संशोधनासाठी निवड केली. त्यांच्याकडून प्रश्नावलीद्वारे, मुलाखतीद्वारे व चर्चेतून संशोधनास आवश्यक असणारी माहिती मिळविली व प्रस्तुत अहवाल तयार केला.

**४.०४ नमुना निवड.**

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविण्यासाठी नमुना निवड खालील पध्दतीने करण्यात आली.

१) जिल्ह्यातील एकूण दहा तालुक्यातील ४७४ माध्यमिक शाळांपैकी प्रत्येक तालुक्यातील लॉटरी पध्दतीने ५० टक्के शाळा नमुना म्हणून निवडण्यात आल्या.

२) नमुना निवडीतून निवडलेल्या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांची प्रतिसादक म्हणून निवड करण्यात आली.

३) नमुना निवड करताना जिल्हा परिषदेच्या व इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांचा विचार करण्यात आला नाही.

४) प्रमुख प्रशासक म्हणून शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकरी, विस्ताराधिकारी यांची प्रतिसादक म्हणून निवड केली.

मुख्याध्यापकांच्या प्रमुख समस्यांचा अभ्यास करण्याच्या हेतूने मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली. ती परिशिष्टामध्ये देण्यात आली आहे. शिक्षणाधिकारी व विस्ताराधिकरी यांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी त्या प्रत्येकांसाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार करून माहिती मिळविली. त्या प्रश्नावल्या परिशिष्टात देण्यात आलेल्या आहेत. उपशिक्षणाधिकारी यांची संशोधन कार्यासाठी निवड केल्यानंतर संशोधनास आवश्यक असणारी माहिती त्यांच्याकडून मुलाखतीद्वारे मिळविली. त्यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची परिशिष्टात देण्यात आली आहे. गटशिक्षणाधिकारी यांची प्रमुख जबाबदारी प्राथमिक शिक्षणाशी निगडीत असल्याने माध्यमिक शिक्षणाचे बाबतीत त्यांचे कार्य जाणून घेण्यासाठी त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. गटशिक्षणाधिकारी यांच्यासाठीच्या मुलाखतीची प्रश्नसूची परिशिष्टामध्ये देण्यात आलेली आहे.

प्रतिसादक शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकरी, गटशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी व मुख्याध्यापक यांची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

**कोष्टक क्र. ४.०२**

**नमुना निवड प्रतिसादके.**

| अ.क्र | प्रतिसादक स्वरूप | प्रतिसादक संख्या |
|---|---|---|
| १. | मुख्याध्यापक | २०० |
| २. | विस्ताराधिकारी | ०४ |
| ३. | गटशिक्षणाधिकारी | ०६ |
| ४. | उपशिक्षणाधिकारी | ०२ |
| ५. | शिक्षणाधिकारी | ०१ |

## ४.०५ - संशोधनाची साधने.

संशोधन कार्यासाठी संशोधन विषयाची निश्चिती केल्यानंतर संशोधनासाठी आवश्यक ती माहिती जमा करणे गरजेचे असते. अशी माहिती जमा करण्यासाठी विविध साधनांचा उपयोग केला जातो. प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती कोणत्या साधनांद्वारे मिळविणे शक्य आहे याचा विचार संशोधकाने केला. माहिती मिळविण्यासाठी संशोधक एका किंवा अधिक साधनांचा उपयोग करू शकतो. अशा साधनांची निवड करून त्यांचा उपयोग करण्यापूर्वी त्या साधनांच्या गुणदोष व मर्यादांची माहिती करून घेणे गरजेचे असते. कोणती साधने केंव्हा व कोठे वापरावेत याचीही माहिती संशोधकास असणे गरजेचे आहे. संशोधक संशोधन कार्यासाठी आवश्यक असणारी गुणात्मक व संख्यात्मक माहिती निरीक्षण, मुलाखती, प्रश्नावली, प्रमाणित चाचण्या, पडताळा सूची, मतावली, गटचर्चा इ. विविध साधनांच्या आधारे मिळवू शकतो. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली, मुलाखती व चर्चा या साधनांचा उपयोग केला आहे.

मुख्याध्यापकांकडून माहिती संकलीत करण्यासाठी संशोधकाने मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली. ती मुख्याध्यापकांकडून भरून घेऊन माहिती मिळविली.

मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीत खालील मुद्यांचा समावेश करून प्रश्न निश्चित करण्यात आले.

## ४.०६ - मुख्यध्यापकांसाठी प्रश्नावली.

मुख्याध्यापकांसाठी तयारी केलेल्या प्रश्नावलीत खालील उद्दिष्ट्ये व प्रश्नप्रकार समाविष्ट केलेले आहेत.

| अ.क्र. | विभाग | | उद्दिष्ट्ये |
|---|---|---|---|
| १. | मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती | - | मुख्याध्यापकांची वैयाक्तिक माहिती घेणे. |
| २. | माध्यमिक शाळेविषयी माहिती | - | शाळेतील सर्वसाधारण माहिती, कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर याविषयी माहिती मिळविणे. |
| ३. | कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर | - | कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर याविषयी माहिती मिळविणे. |

| | | |
|---|---|---|
| ४. शिक्षकांविषयी माहिती | - | माध्यमिक शाळेच्या शिक्षकाविषयी माहिती मिळविणे. |
| ५. विद्यार्थ्यांविषयी माहिती | - | विद्यार्थ्यांविषयी माहिती मिळविणे. |
| ६. भौतिक सुविधा व शालेय परिसर | - | भौतिक सुविधा व शालेय परिसर याविषयी माहिती घेऊन शाळेच्या अडचणींची नोंद घेणे. |
| ७. इतर | - | संशोधनासाठी आवश्यक असणारी इतर माहिती मिळविणे. |

माध्यमिक शाळांच्या प्रशासनाची माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने विविध संदर्भग्रंथाचा अभ्यास करून मुख्याध्यापकासाठी प्रश्नावली तयार केली. प्रश्नावलीत एकूण ६७ प्रश्नाचा समावेश होता. त्यातील ५० प्रश्न बध्दस्वरूपाचे होते तर १७ प्रश्न हे मुक्त स्वरूपाचे होते दोन्ही स्वरूपाच्या प्रश्नांतून व काही प्रश्नांबाबत मुख्याध्यापकांशी चर्चा करून संशोधनास आवश्यक असणारी माहिती मिळविली.

प्रश्नावलीतील प्रत्येक विभागात खालील प्रमाणे प्रश्न विचारण्यात आले.

**विभाग १ - मुख्याध्यापकाची वैयक्तिक माहिती** -यात चार प्रश्न विचारण्यात आले. यात मुख्याध्यापकाची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, अनुभव, प्रभारी की कायम इ. बाबींचा समावेश होता.

**विभाग २ - शाळेविषयी माहिती** - यात सात प्रश्न विचारण्यात आले. त्यात शाळेच्या व्यवस्थापनाचा प्रकार, शाळेचा प्रकार, अनुदानाचे स्वरूप, विद्यार्थी संख्या, कर्मचारी वर्ग इ. माहिती संकलित करण्याच्या उद्देशाचे प्रश्न होते.

**विभाग ३ - कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर** - यात एकूण २२ प्रश्न विचारले. त्यात शाळेतील अभिलेखे, शिक्षक पालकसंघ, शालेय व्यवस्थापन समिती, इतर नोंदी इ. बाबींच्या समस्या जाणून घेणे हा उद्देश होता.

**विभाग ४ - शिक्षकांविषयी** - यात एकूण १० प्रश्न विचारण्यात आले. शिक्षकांची अध्यापन पद्धती, मुख्याध्यापकाचे पाठनिरीक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण इ. बाबतच्या प्रश्नांचा समावेश केला.

**विभाग ५ - विद्यार्थ्यांविषयी** - यात एकूण १२ प्रश्नांचा समावेश करण्यात आला.

यात विद्यार्थी उपस्थिती, विद्यार्थ्यांसाठी राबविले जाणारे विविध उपक्रम, विविध स्पर्धा परीक्षेस विद्यार्थ्यांचा सहभाग, आरोग्य तपासणी इ. बाबींच्या समस्या जाणून घेणे हा उद्देश होता.

**विभाग ६ - भौतिक सुविधा विषयक** - यात एकूण ११ प्रश्न विचारण्यात आले. यात शालेय इमारत, उपलब्ध फर्निचर, पिण्याच्या पाण्याची सोय, क्रीडांगण, इ. बाबाच्या समस्यां जाणून घेणे हा उद्देश होता.

**विभाग ७ - इतर माहिती** - शाळेत उपलब्ध असणारी इतर सामुग्री व शाळेच्या इतर समस्या जाणून घेण्यासाठी एक मुक्त स्वरूपाचा प्रश्न विचारण्यात आला. मुख्याध्यापकांसाठी तयार केलेली प्रश्नावली परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आलेली आहे.

**४.०७ - शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली.**

लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील विस्ताराधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली तयार करण्यात आली. संबंधितांशी केलेल्या चर्चेतून व अभ्यासातून त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार प्रश्नावलीत एकूण - ४१ प्रश्नांचा समावेश करण्यात आला. प्रश्नावलीचे एकूण 'अ' व 'ब' असे दोन विभाग करण्यात आले.

'अ' विभागात विस्ताराधिकाऱ्यांची वैयक्तिक माहिती विचारण्यात आली होती. 'ब' विभागात त्यांच्या कामकाजांविषयी माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारण्यात आले. 'ब' विभागातील प्रश्न प्रामुख्याने शाळा तपासणी, नवीन शाळांच्या मान्यता, विविध परीक्षांत विस्ताराधिकाऱ्यांचे कर्तव्ये इ. बाबींवर आधारित होते. प्रश्नावली परिशिष्ट 'क' देण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात एकूण चार विस्ताराधिकारी कार्यरत आहेत. सर्वांची प्रतिसादक म्हणून संशोधनासाठी निवड केली व त्यास त्यांचा प्रतिसाद प्राप्त झाला.

**४.०८ - गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची.**

लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यांच्या शैक्षणिक प्रशासनाचा प्रमुख म्हणून गट शिक्षणाधिकारी (पंचायत समिती ) यांची मुलाखत घेण्याचे संशोधकाने ठरविले.

जिल्ह्यात एकूण दहा तालुके आहेत. त्यातील सहा तालुक्यांच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांची संशोधकाने मुलाखत घेतली माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात

गटशिक्षणाधिकाऱ्यांना कराव्या लागणाऱ्या कामाच्या बाबतीत संशोधकाने एकूण वीस प्रश्न विचारले व संशोधन कार्यासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविली.

सदरील मुलाखतीची प्रश्नसूची परिशिष्ट 'ड' देण्यात आली आहे.

**४.०९ - उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची.**

उपशिक्षणाधिकारी हे शिक्षणाधिकारी (मा.) यांच्या दैनंदिन कामकाजात प्रत्यक्ष मदत करतात तर शिक्षणाधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाने विस्ताराधिकाऱ्यांकडून जिल्ह्यातील संपूर्ण शाळांची पाहणी करतात. म्हणून जिल्हापातळीवर उपशिक्षणाधिकारी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे हे लक्षात घेऊन संशोधनाने उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखती घेण्याचे ठरविले. संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविण्यासाठी एकूण ३६ प्रश्नांची मुलाखतसूची तयार केली. यातील २६ प्रश्न बध्द स्वरूपाचे होते. तर १० प्रश्न मुक्त स्वरूपाचे होते. संशोधनासाठी आवश्यक असणारी संपूर्ण माहिती केवळ प्रश्नावलीद्वारे मिळू शकत नाही म्हणून संशोधकाने उपशिक्षणाधिकाऱ्यांना प्रश्नावली देण्याचे टाळून प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. मुलाखतीसाठीची प्रश्नसूची परिशिष्ट 'इ' देण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात एकूण दोन उपशिक्षणाधिकारी कार्यरत असून संशोधकाने प्रतिसादक म्हणून दोघांची निवड केली. त्यापैकी दोघांनीही मुलाखतीस प्रतिसाद दिला.

**४.१० - शिक्षणाधिकाऱ्यासाठी प्रश्नावली.**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हा संपूर्ण जिल्ह्यातील माध्यमिक शाळांचा प्रमुख प्रशासक आहे. शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणारी माहिती शाळांना पुरविणे, विविध शैक्षणिक योजना राबवून घेणे, माध्यमिक शाळेतील कर्मचाऱ्यांस मान्यता देणे, शाळा तपासणी करणे, जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रगतीचा अहवाल दरवर्षी वरिष्ठास सादर करणे इ. महत्त्वाची कामे शिक्षणाधिकाऱ्यास पार पाडवी लागतात, म्हणून संशोधन कार्यासाटी आवश्यक असणारी माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने शिक्षणाधिकारी यांचेसाठी प्रश्नावली तयारी केली.

प्रश्नावलीत एकूण ९३ प्रश्नांचा समावेश करण्यात आला. प्रश्नावलीची 'अ' आणि 'ब' अशा दोन विभागात विभागणी करण्यात आली. 'अ' विभागात अधिकाऱ्याचे नाव, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता व अनुभव बाबतचे तीन प्रश्न समाविष्ट होते तर

'ब' विभागात त्यांच्या संपूर्ण कामकाजाविषयी एकूण ९० प्रश्न विचारण्यात आले. शिक्षणाधिकाऱ्यांसाठीची प्रश्नावली परिशिष्ट 'फ' देण्यात आली आहे.

**४.११ - माध्यमिक शाळांना भेटी व निरीक्षणे.**

संशोधन कार्यासाठी आवश्यक माहिती मिसविण्यासाठी संशोधकाने लातूर जिल्ह्यातील २५ शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. संबंधित शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याशी चर्चा केली. प्रत्यक्ष निरीक्षणातून मिळालेली महिती अचूक असते म्हणून संशोधकाने संशोधन कार्यात अचूकता यावी यासाठी निवडक शाळांना भेटी दिल्या.

प्रत्यक्ष भेटीत शालेय इमारत, क्रीडांगण, फर्निचर, उपलब्ध शैक्षणिक साहित्य, ग्रंथालय, स्वच्छातागृहाची सोय, विद्यार्थ्यांची उपस्थिती इ. बाबींचे संशोधकाने निरीक्षण केले. त्यात असे निदर्शनास आले की ५ शाळा पत्र्यांच्या शेडमध्ये चालतात. १० शाळा कच्च्या इमारतीत चालतात. ३ शाळांना पुरेसे क्रीडांगण नाही तर ७ शाळा इमारतीच्या बाबतीत परिपूर्ण आहेत. जवळपास १५ शाळांना शैक्षणिक साहित्य अपुरे आहे तर केवळ ०६ शाळांमधून शिक्षक अध्यापनाच्या वेळी शैक्षणिक साहित्याचा वापर करतात. बहुतांश शाळेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी शाळा गंभीर नाहीत.

**४.१२ - संशोधनाची कार्यपध्दती.**

संशोधकाने संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी पुढील कार्य पध्दतीचा अवलंब केला.

१) माध्यमिक शाळांशी संबंधित संदर्भ ग्रंथाचा व शासकीय परिपत्रकांचा अभ्यास केला.

२) संदर्भ साहित्याच्या अभ्यासानंतर प्रस्तुत संशोधनाचा आराखडा तयार केला.

३) माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी जि.प. हायस्कुल, रेणापूर येथील मुख्याध्यापकाकडून व माध्यमिक शिक्षण विभागाचे अधीक्षक यांच्याकडून माहिती मिळविली.

४) लातूर जिल्ह्यातील एकूण दहा तालुक्यातील स्वंयसेवी संस्थांनी चालविलेल्या अनुदानीत, अंशतः अनुदानीत, विना-अनुदानीत व कायम विना-अनुदानीत शाळांची निवड संशोधन अभ्यासासाठी केली.

५) माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली. शिक्षणाधिकारी (मा.) यांचेसाठी प्रश्नावली तयार केली. विस्ताराधिकारी यांचेसाठी प्रश्नावली तयार केली. उपशिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीसाठी

प्रश्नसूची तयार केली.

६) तयार केलेली प्रश्नावली व प्रश्नसूची शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथील प्रा. डॉ. सौ. पवार, प्राचार्य डॉ. शेख के.ए. व प्रा.डॉ.गायकवाड एम्. ए. यांचेकडून तपासून घेतली.

७) संशोधनाची अपेक्षित उद्दिष्ट्ये साध्य होतील या दृष्टीने संपूर्ण माहिती उपलब्ध होईल अशा प्रश्नांचा प्रश्नावलीत व प्रश्नसूचीत समावेश करण्यात आला.

८) काही मुख्याध्यापकांकडून, विस्ताराधिकाऱ्यांकडून व शिक्षणाधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष भेटीतून प्रश्नावली भरून घेण्यात आली. उपशिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांची भेट घेऊन मुलाखती घेतल्या.

९) इतर मुख्याध्यापकांच्या प्रश्नावली या मिटींगच्या वेळी व पोस्टाद्वारे प्राप्त झाल्या.

१०) संशोधन कार्य चालू असतांना संशोधकाने २५ शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या व माध्यमिक शाळांतील उपलब्ध घटकांचे निरीक्षण केले, त्यांच्या नोंदी केल्या.

११) प्रश्नावलीद्वारे मिळविलेली माहिती एकत्रित केली. प्रत्येक प्रश्नांविषयी प्रतिसादकांच्या प्रतिसादांचे संकलन केले. प्राप्त माहितीच्या विश्लेषणासाठी व स्पष्टीकरणासाठी संख्याशास्त्रीय 'शतमान' पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

१२) प्रतिसादक मुख्याध्यापक, विस्ताराधिकारी, गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या प्रश्नवलीचे व प्रश्नसूचीचे प्रतिसादाची संख्या व शेकडा प्रमाण काढले. संख्याशास्त्रीय माहितीचे विश्लेषण करण्यात आले. प्राप्त माहिती कोष्टकांच्या स्वरूपात संकलित करण्यात आली.

**४.१३ - समारोप.**

मुख्याध्यापक, विस्ताराधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या प्रश्नावलीतून मिळालेली माहिती व गटशिक्षणाधिकारी आणि उपशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीतून मिळालेली माहिती, शाळांचे प्रत्यक्ष भेटीतून केलेले निरीक्षण या सर्व माध्यमातून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व विशदीकरण करण्यात आले व ते पुढील प्रकरणात देण्यात आलेले आहे.